ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १४ जुलै, १९५४ | अंक १७

## विविध माहिती

**अधिक टेलिव्हिजन सेट्सचें उत्पादन**—चालू वर्षी रशिआंत ३,००,००० टेलिव्हिजन सेट्सचें उत्पादन होणार असून पुढील वर्षी ७,००,००० सेट्सचें उत्पादन करण्याचें लक्ष्य ठरविण्यांत आलें आहे. रंगीत टेलिव्हिजनच्या कार्यक्रमांची चांचणीहि लवकरच सुरू करण्यांत येणार आहे. सध्यां मॉस्कोमधून क्षेपित करण्यांत येणारे कार्यक्रम ४४ मैलांपर्यंतचे लोक पाहूं शकतात.

**चीन ब्रिटनच्या मोटारी घेणार ?**—ब्रिटनमधील मोटार-कारखानदारांकडून मोठ्या प्रमाणावर मोटार-लॉऱ्या विकत घेण्यास चीन तयार आहे असें समजतें. चीनमधील कामगार-संघाचे १० प्रतिनिधी सध्यां ब्रिटनचा दौरा करीत आहेत. त्यांनीं ऑस्टिन कारखान्याला भेट दिली त्यावेळीं अशा आशयाचे सूचक उद्गार काढले.

**त्रावणकोर-कोचीनमधील हिंवताप**—त्रावणकोर-कोचीन राज्यांतील मलेरिआच्या तापाविरुद्ध मोहीम चालविण्यांत आली होती, त्यावेळीं डी. डी. टी. चा उपयोग करण्यांत आला होता. ह्या जंतुघ्न औषधावर खर्च करण्यांत आलेल्या प्रत्येक रुपयामागें ९३ रुपयांचा लाभ झाला असा हिशेब करण्यांत आला आहे. हिंवतापामुळें राज्यांतील शेतकरी लोकांचे १,१७,००,००० कामाचे दिवस वाया जात असत.

**मध्य-भारतामधील लोकरीचा धंदा**—मध्य-भारतामधील नेमाड जिल्ह्यांत लोकरीचा धंदा स्वतःच चालविण्याची योजना राज्य सरकारनें आंखली आहे. धंद्यासाठीं लागणारा कच्चा माल आणि यंत्रें दोन्हींचीहि जमवाजमव करण्यांत आली आहे. ह्या धंद्यांत पूर्ण दिवस काम करणारे ९० मजूर आणि अर्धा दिवस काम करणारे ६०० मजूर ह्यांना रोजगार मिळेल असें समजतें.

**पावसाविरुद्ध विम्याचें संरक्षण**—वेळीं-अवेळीं पडणाऱ्या पावसामुळें हौशी प्रवाशांचा हिरमोड होतो. अशा पावसाविरुद्ध विमा-करार करण्याची पद्धत ऑस्ट्रेलिआंत लवकरच चालू करण्यांत येणार आहे असें समजतें. सुटीपैकीं जो दिवस पावसामुळें वाया जाईल त्या दिवसासाठीं नुकसान-भरपाई देण्याची योजना विमा-करारांत करण्यांत येणार आहे.

**चिनी सरकारचे औद्योगिक बेत**—१९५९ पर्यंत जपानच्या खालोखाल आपला औद्योगिक उत्कर्ष साधण्याचे बेत चीनच्या सरकारनें आखलेले आहेत. १९३२ सालीं रशिआचा जितका औद्योगिक विकास झाला होता तितका साधण्याच्या योजनाहि आंखण्यांत येत आहेत. ह्या कार्यक्रमांत १४० मोठमोठे कारखाने उभारण्यांत यावयाचे आहेत. ह्या कारखान्यांची यंत्रसामुग्री सोव्हिएट रशिया पुरविणार आहे.

**भिकारी मुलांसाठीं सिनेमा**—दिल्ली येथील एका सभागृहांत ३५० भिकारी मुलांना 'बूट-पॉलिश' हा सिनेमा दाखविण्यांत आला. कुमार्गाला लागलेल्या मुलांचे खटले ऐकणाऱ्या एका स्त्री-मॅजिस्ट्रेटच्या खटपटीनें हा प्रसंग घडवून आणण्यांत आला. चित्रपटांत भीक मागण्याविरुद्ध प्रचार करण्यांत आला आहे.

**मध्यभारतांत अमेरिकन कापूस**—मध्य-भारतांत अमेरिकन जातीचा कापूस मोठ्या प्रमाणावर लावण्याचें राज्य-सरकारनें ठरविलें असल्याचें समजतें. ह्या कापसाची लागवड करण्यासाठीं बडनावर भागाची निवड करण्यांत आली आहे.

**लखनौ प्राणिसंग्रहालयाला मदत**—उत्तर-प्रदेश सरकारनें लखनौ येथील प्राणि-संग्रहालयाला १०,००० रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे. ह्या रकमेचा विनियोग करून तेथें एक मत्स्यालय उभारण्यांत यावयाचें आहे. मत्स्यालयामुळें लोकांची करमणूक तर होईलच पण माशांचा अभ्यास करणारांचीहि सोय होईल.

**सुवासिक कापराचें उत्पादन**—मध्य-भारताच्या शिवपुरी आणि इतर जंगल विभागांत सांपडणाऱ्या जंगलांतील वस्तूंचा उपयोग करण्याची एक योजना राज्य-सरकारनें आंखली आहे. तुळशीच्या अर्कापासून सुवासिक कापूर बनविण्याचा कारखाना काढण्याचा विचारहि सरकार करीत आहे. जंगलांतील मालापासून पक्का माल बनविण्याचें शिक्षण देणारीं १४ केंद्रेंहि चालू करण्यांत आलीं आहेत.

**महात्माजींच्या चरित्राची भेट**—अमेरिकेचे अध्यक्ष मि. ऐसेन होअर ह्यांना गांधीजींच्या अष्ट-खंडात्मक चरित्राची भेट भारता-तर्फे नुकतीच देण्यांत आली. भेट देण्याचा समारंभ भारताचे अमेरिकेंतील वकील श्री. जी. एल. मेहता ह्यांच्या हस्तें साजरा करण्यांत आला.


**रवींद्रनाथ टागोरांचें स्मारक**—तेरा वर्षांपूर्वी रवींद्रनाथ टागोर ह्यांचें निधन झालें. त्यावेळीं त्यांचा दहनविधि निमतोल घाटावर करण्यांत आला होता. ह्या ठिकाणीं त्यांचें तात्पुरतें स्मारक उभारण्याची परवानगी कलकत्ता कॉर्पोरेशनकडे मागण्यांत आली आहे. स्मारकासाठीं दुसरी चांगली जागा मिळाल्यावर तात्पुरतें स्मारक तेथून हलविण्याची मुभा कॉर्पोरेशनला देण्यांत आली आहे.

**बेसिक ट्रेनिंग कॉलेज**—भोपाळ सरकारनें भोपाळ येथें एक बेसिक ट्रेनिंग कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. कॉलेज काढण्यासाठीं ३,६६,००० रुपये खर्च येणार आहे. कॉलेजमध्यें बेसिक शाळांना लागणाऱ्या शिक्षकांना शिक्षण देण्यांत यावयाचें आहे.


# उत्पादक शेतीकरितां तुम्हीं ॲग्रिकोवर भरंवसा ठेवा



मुंबई खवडें :—आश्चर्यकारक मजबूत व वापरण्यांत सोईस्कर. २॥ पौंड, २॥। पौंड व ३ पौंड वजनाचे मिळतात.



चौरस तोंडाचें फावडें :—उंची कार्बन पोलादापासून आय. एस. आय. च्या नमुन्या बरहुकूम बनविलेलें. व दणकट लाकडी मूठ बसविलेलें.



पश्चिम भारत खवडें :—आश्चर्यकारक मजबूत असून वापरण्यांत सोईस्कर आहे. मजबूत बाजू टिकाऊपणाची हमी देतात.

## ॲग्रिको

योग्य कामास योग्य अवजार!



भारतांतील सहस्त्रावधि शेतांतून ॲग्रिको अवजारें आजकाल आश्चर्यकारक काम देत आहेत. उंची कार्बन पोलादापासून श्रेष्ठ दर्जाच्या शक्तिसाठीं कसोशीनें तपासणी करून बनविलेलीं ॲग्रिको अवजारें सर्व ठिकाणच्या शेतकऱ्यांच्या पसंतीचीं आहेत.

## टाटा ॲग्रिको अवजारें

दी टाटा आयर्न ॲण्ड स्टील कंपनी लिमिटेड

हेड सेल्स् ऑफीस :—

२३ बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता-१.

शाखा :—

मुंबई, मद्रास, नागपुर, अहमदाबाद, सिकंदराबाद, विजयनगरम् कॅन्टोनमेंट, जलंदर कॅन्टोनमेंट व कानपुर.

व पाटणा

AG. 3366

# अर्थ

बुधवार, ता. १४ जुलै, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बंगालमध्यें सोडा ॲशचा कारखाना

भारतांत सोडा ॲशचा धंदा स्थापन करणें कितपत शक्य आहे तें अजमावण्यासाठीं भारतीय सरकार सध्यां तपास करीत आहे. आज भारतांत सोडा ॲश निर्माण करणारे फक्त दोनच कारखाने असून ते सौराष्ट्रांत आहेत. ह्या कारखान्यांचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न सध्यां चालू आहेत. तथापि कारखान्यांच्या उत्पादनशक्तीचा विस्तार केल्यावर सुद्धां दोन्हीं कारखान्यांतून दरवर्षी सुमारें ८६,४०० टन सोडा ॲशच निर्माण होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. पण भारताला दरवर्षी निदान २,००,००० टन तरी सोडा ॲशची जरूरी लागते. म्हणून भारतांत आणखी दोन कारखाने काढण्याचा सरकारचा विचार आहे. संकल्पित नव्या कारखान्यांसाठीं योग्य जागा शोधून काढण्यासाठीं भारतीय सरकारनें दोघा तज्ज्ञांची नेमणूक केली होती. हे तज्ज्ञ प. बंगालमधील काँटाय आणि दुर्गापूर ह्या दोन ठिकाणांची नुकतीच पहाणी करून गेले आहेत. प. बंगाल सरकारच्या उद्योगखात्यानें ह्या विषयासंबंधीं आपला अहवाल भारतीय सरकारच्या तज्ज्ञांना सादर केला आहे. ह्या अहवालांत बंगालमध्यें सोडा ॲशचा कारखाना काढण्यासंबंधींची तांत्रिक, आर्थिक आणि इतर जरूर ती माहिती ग्रथित करण्यांत आली आहे.

अहवालांत असें नमूद करण्यांत आलें आहे कीं, देशांत सोडा ॲशची जेवढी मागणी आहे तींपैकीं ४० ते ५० टक्के मागणी पूर्व भारताकडून येत असते. पूर्व भारतांत प. बंगाल, आसाम, बिहार, ओरिसा आणि उत्तर प्रदेशाचा कांहीं भाग येवढ्या प्रदेशांचा समावेश होतो. भारतांत सोडा ॲशचें उत्पादन करणारे जे दोन कारखाने सध्यां आहेत ते ह्या प्रदेशापासून १,००० मैलांपेक्षाहि दूर अंतरावर आहेत. म्हणून बंगालमधील वरील दोन ठिकाणें नवे कारखाने काढण्यास सोयीचीं अशीं आहेत. सोडा ॲशच्या उत्पादनासाठीं मीठ, चुनखडीचा दगड आणि कोळसा ह्या कच्च्या मालाची आवश्यकता असते. हा सर्व कच्चा माल काँटाय आणि दुर्गापूर ह्या दोन्हीं ठिकाणीं सहज मिळण्यासारखा आहे. काँटाय येथें मीठ तयार करतां येण्यासारखें असून दुर्गापूर येथें कोळसा भरपूर प्रमाणांत उपलब्ध आहे. चुनखडीचा दगड ओरिसा राज्यांतून मिळूं शकेल. शिवाय दुर्गापूर ह्या ठिकाणीं कारखाना काढल्यास आणखीहि कांहीं फायदे अनायासें मिळण्यासारखे आहेत. भांडवली खर्चांत बचत होणें आणि वाहतुकीच्या साधनांचा लाभ होणें ह्या गोष्टी तर साधतीलच; पण ह्या ठिकाणीं निर्माण करण्यांत येणाऱ्या विद्युत्–निर्माण–केंद्रांचाहि सोडा ॲशच्या कारखान्याला उपयोग होईल. सोडा ॲश निर्माण करण्याची एक किंचित् निराळी पद्धतहि अहवालांत सुचविण्यांत आली आहे. ह्या पद्धतीचा उपयोग केल्यास अमोनिअम क्लोराइड हें खतहि सहज निर्माण करतां येण्यासारखें असल्याचेंहि सूचित करण्यांत आलें आहे.

## कृत्रिम धाग्यांचा वाढता वापर

कपाशीसारख्या नैसर्गिक धाग्यांची जागा कृत्रिम (मनुष्य–निर्मित) धागे घेऊं लागले आहेत. आणि त्या धाग्यांचे निर्माते संघटना करूं लागले आहेत. "इंटरनॅशनल काँग्रेस ऑफ मॅन-मेड फायबर्स" चें अधिवेशन पॅरिस येथें नुकतेंच भरलें होतें, त्यास ३१ देशांतील २,२०० प्रतिनिधी उपस्थित होते. ह्यावरून कृत्रिम धाग्यांचें वाढलेलें महत्त्व लक्षांत येईल. ह्या कृत्रिम धाग्यांत रेयॉन हा सर्वांत महत्त्वाचा आहे व तें नांव बहुतेकांच्या परिचयाचें आहे. गेल्या कांहीं वर्षांत रेयॉनचें उत्पादन पुष्कळच वाढलेलें आहे. १९१३ मध्यें कृत्रिम धाग्यांचें उत्पादन १३,००० टन होतें तें १९२९ मध्यें २,००,००० टन झालें व १९३९ मध्यें तें १०,००,००० टनांवर गेलें. १९५३ मधील कृत्रिम धाग्यांचें उत्पादन सुमारें २० लक्ष टन झालें असावें. कृत्रिम धाग्यांपैकीं ५०% धाग्यांचें उत्पादन एकट्या युरोपांत होतें, अमेरिकेंत ३०% होतें व जपानमध्यें १०% होतें. १९३८ व १९५१ चें नैसर्गिक व कृत्रिम धाग्यांचें, दर माणशीं खपाचें प्रमाण खालीं दिलें आहे :—

| | १९३८ | १९५१ |
|---|---|---|
| कपास | ७८·४% | ७३·२% |
| कृत्रिम धागे | १०·८% | १७·०% |
| लोंकर | १०·८% | ९·८% |
| | १००·०% | १००·०% |

एकूण कापडापैकीं कपास कापडाचें प्रमाण ७८·४% चें ७३·२% झालें आहे, परंतु कृत्रिम धाग्यांपासून केलेल्या कापडाचा उठाव १०·८% वरून १७·०% पर्यंत वाढला आहे. म्हणजे, कृत्रिम धाग्यांचा वापर कपाशीच्या धाग्यास मागें सारूं लागला आहे. कापडाप्रमाणें इतर जिनसांच्या बनावटींतहि कपाशीच्या धाग्यापेक्षा रेयॉनचा धागा अधिक चांगलें काम देतो, असें आढळून आलें आहे आणि मोटार टायर्समधील कपाशीच्या धाग्याची जागा रेयॉनचा धागा बळकावूं लागला आहे. रेयॉन किंमतीच्या बाबतींत कपाशीच्या धाग्याशीं स्पर्धा करूं शकतो व कपाशीच्या धाग्यापेक्षा रेयॉनचा धागा अधिक एकजात असतो. रेयॉनचें उत्पादन गिरण्यांतील नियंत्रित वातावरणांत होत असतें, तर कपास शेतांत पिकते. कपाशीचें उत्पादन मागणीबरहुकूम आटोक्यांत ठेवतां येत नाहीं किंवा वाढवितां येत नाहीं; त्यांत लवचीकपणा नसतो. रेयॉनचें उत्पादन बाजाराच्या परिस्थितीप्रमाणें कमी–अधिक करतां येतें. अशा रीतीनें कृत्रिम धाग्यांचें नैसर्गिक धाग्यांवर आक्रमण होऊं लागलें आहे व त्यांची किंमत बरीच उतरवतां आली तर त्यांना फार मोठी बाजारपेठ उपलब्ध होईल.

### त्रावणकोर रेयॉन्स लि.

त्रावणकोर रेयॉन्स लि. ह्या भारतांतील कारखान्यानें १९५० मध्यें ७·८५ लक्ष पौंड, १९५१ मध्यें २५·५६ लक्ष पौंड, १९५२ मध्यें ३१·९२ लक्ष पौंड व १९५३ मध्यें ४०·२६ लक्ष पौंड रेयॉनचें उत्पादन केलें. उत्पादनक्षमता वाढवून, दररोज ९·१ टन उत्पादन ह्यापुढें करण्याचा कंपनीचा विचार आहे. टॉफी, तंबाखू, सिगारेटस् इत्यादींच्या वेष्टनासाठीं लागणारा आर्द्रता बाहेर राखणारा पारदर्शक कागद मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्यांत येणार आहे.

## मराठा चेंबरमध्यें मध्यवर्ती अर्थखात्याच्या उपमंत्र्यांचें भाषण

मराठा चेंबरची वार्षिक सभा १८ जून रोजीं झाली. त्या सभेचें उद्‌घाटन करतेवेळीं मध्यवर्ती अर्थखात्याचे उपमंत्रि, श्री. म. च. शहा, यांनीं चालू आर्थिक प्रश्नांची चर्चा केली व चेंबरचे मावळते अध्यक्ष श्री. नातू यांच्या कित्येक सूचनांचा परामर्श घेतला. श्री. शहा यांच्या भाषणांतील कांहीं उतारे येथें दिले आहेत:—

### यंत्रमाग व हातमाग

" यंत्रमाग कारखान्यांच्या विशेषत: रुंद पन्ह्याच्या साड्या तयार करणारे यंत्रमाग असणाऱ्या कारखान्यांच्या कांहीं अडचणींचा तुम्हीं उल्लेख केला आहे. उत्पादनाचीं क्षेत्रें राखून ठेवण्याच्या प्रश्नासाठीं यंत्रमाग व हातमाग यांचा एकत्र गट करण्यांत यावा आणि हातमाग धंद्यासाठीं आतां राखून ठेवण्यांत आलेल्या रंगीत साड्या तयार करण्याची यंत्रमागासहि परवानगी देण्यांत यावी अशी सूचना करण्यांत आली आहे. खूपच बेकारी असणाऱ्या एका जुन्या धंद्यास तात्पुरता संरक्षक उपाय म्हणून ही उत्पादन राखून ठेवण्याची पद्धति आहे. राखीव उत्पादन क्षेत्र हा हातमागाच्या पुनरुज्जीवनाचा आणि हातमागधंद्याच्या उत्पादनास स्थैर्य आणण्याचा कायमचा किंवा परिणामकारक उपाय होऊं शकत नाहीं. यावरून यंत्रमागासंवर्धाचें, तसेंच हातमागाबाबतचें सरकारचें धोरण स्पष्ट होईल. सरकार या प्रश्नाचा खुल्या मनानें विचार करीत असून हा सर्व प्रश्न टेक्स्टाइल इन्क्वायरी कमिटीपुढें विचारार्थ असून तिचा अहवाल लवकरच मिळण्याची अपेक्षा आहे आणि या तज्ज्ञ समितीच्या निष्कर्षांचा विचार केल्यावांचून आणखी कांहीं बदल करण्याची अपेक्षा करतां येणार नाहीं.

### जकाती आणि संरक्षण

" उद्योगधंद्यांस संरक्षण आणि त्यांचे विकासास साह्य देण्याचे दृष्टीनें अधिक महसुली आयात करांचें अस्तित्व कारणीभूत असल्याचा निर्देश तुमच्या अध्यक्षांच्या भाषणांत आला आहे. उद्योगधंद्यांस लागणाऱ्या कच्च्या मालावरील जकातीचे बाबतींत, त्यांना सहाय्यभूत होतील अशा प्रकारें जकातीची चौकट अधिक शास्त्रीय पद्धतीनें तयार करण्याची विनंतीहि करण्यांत आली आहे. या विषयाबद्दलच्या कांहीं गैरसमजुती मला दूर कराव्याशा वाटतात. अनेक पाश्चिमात्य देशांत अस्तित्वांत असलेल्या सर्वसाधारण कर-पातळीपेक्षां भारतासारख्या अविकसित राष्ट्रांतील ही पातळी अधिक नाहीं. विविध वस्तूंवरील जकातीचे दर अशा रीतीनें ठरविलेले आहेत कीं, केवळ चैनीच्या वस्तूंवरील जकातीचे दरच त्यांच्या मूळ किंमतीच्या १०० टक्क्यांहून अधिक आहेत. परंतु सर्वसामान्य उपयोगाच्या वस्तूंवरील असे दर अर्थसंकल्पाचा विचार करतां शक्य होतील तितके कमी ठेवलेले आहेत. अन्नधान्य, दुग्धपदार्थ, यंत्रसामुग्री, आणि मलेरिया प्रतिबंधक औषधें यांसारख्या बऱ्याच वस्तूंवर एकतर अजिबात कर नाहींत अगर फार कमी महसुली कर आहे. उद्योगधंद्यांस लागणाऱ्या अनेक कच्च्या पदार्थांवर जकात माफ असून अगदीं अलिकडेच या धोरणानुसार कच्चा कापूस आणि पोलादाच्या कांहीं जातींवरील आयात-कर रद्द करण्यांत आला आहे.

### परकीय भांडवल

" भारतीय उद्योगधंद्यांनीं प्राथमिक कार्य केलेल्या तसेंच संरक्षण मिळत असलेल्या धंद्यांतहि परकीय भांडवल आणूं दिल्याबद्दल आपली मुख्य तक्रार असल्याचें दिसतें. तथापि देशांतील उद्योगपतींनीं एखाद्या विविक्षित क्षेत्रांत उत्पादन चालू केलें म्हणजे देश त्या बाबतींत स्वयंपूर्ण झाला असें होत नाहीं आणि आपल्या वाढत्या अर्थकारणाचे साह्यानें आपण त्यांत स्वयंपूर्णता प्राप्त करून घेतली तरी पुरवठ्यापेक्षा मागणी अधिक होण्याची शक्यता आहे. तुमच्या शब्दांत असें म्हणतां येईल कीं एकाद्या दुसऱ्या कारखान्यांत उत्पादनास सुरुवात झाल्याक्षणींच विकासाची गरज संपते असें नाहीं. म्हणून या क्षेत्रांत भारतीय भांडवल असल्यानें अशा विकासाकरितां परकीय भांडवल घ्यावें कीं नाहीं असा प्रश्न आहे. परकीय भांडवल गुंतविण्याच्या प्रत्येक प्रकरणाचा त्यास परवानगी देण्यापूर्वी अत्यंत काळजीपूर्वक विचार करण्यांत येतो व तें भांडवल वाटेल त्या क्षेत्रांत गुंतविण्यास परवानगी नसते याबद्दल मी आपणांस खात्री देतों. आमच्या साधनसामुग्रीस पूरक म्हणून परकीय भांडवलाचा उपयोग झाला पाहिजे. त्यानें भारतांतील भांडवल पडून राहून भारतीय धंदा बसतां कामा नये अशी त्याची भूमिका असावी."

---

### पाकिस्तानच्या परराष्ट्रीय मिळकतींत घट

कोरियन युद्धकाळांत पाकिस्तानला परदेशी व्यापारांत दरसाल २०० कोटी रुपये मिळत असत; आतां ही मिळकत सालिना १५० कोटींवर आली आहे. त्यांपैकीं कपास आणि ताग हे ८५ कोटी रुपये मिळवून देतात.

**जिनसांच्या किंमती : तुलनात्मक इंडेक्स नंबर**

**( ऑगस्ट, १९३९ अखेरचें वर्ष = १०० )**

| जिन्नस | कोरियापूर्वी ( २४ जून १९५० ) | ऑगस्ट १५, १९५३ | डिसेंबर १२, १९५३ | जानेवारी २३, १९५४ | मार्च ६, १९५४ | एप्रिल १०, १९५४ | एप्रिल २४, १९५४ | मे २९, १९५४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. अन्न | ४०७.१ | ४०९.८ | ३६३.४ | ३८६.३ | ३६७.३ | ३८९.० | ३७५.५ | ३५७.० |
| २. औद्योगिक कच्चा माल | ४९४.२ | ४८९.४ | ४५२.० | ४८४.३ | ४५९.९ | ४७२.२ | ४७४.७ | ४५५.४ |
| ३. अर्ध-पक्का माल | ३३५.५ | ३६६.८ | ३५६.० | ३६२.९ | ३५५.७ | ३५९.९ | ३६६.३ | ३५९.६ |
| ४. पक्का माल | ३४६.९ | ३७१.० | ३६३.८ | ३६४.७ | ३७१.३ | ३८०.६ | ३८२.७ | ३७९.० |
| ५. इतर | ६९२.४ | ७०५.० | ७१०.६ | ७११.४ | ६८५.२ | ७०६.३ | ७०६.२ | ६८३.२ |
| ६. सर्व जिन्नस | ३९७.१ | ४११.९ | ३८७.० | ४०१.० | ३९१.३ | ४०४.४ | ४०२.४ | ३९०.४ |

## गूळ कारखाना साखरेचें उत्पादन करणार

### चितळे शुगर वर्क्स लि., ची स्थापना

ही कंपनी प्रामुख्यानें उसापासून साखरेचें उत्पादन करण्यासाठीं व त्यापासून होणाऱ्या इतर पदार्थांचें व उप-पदार्थांचें उत्पादन करण्यासाठी स्थापन झाली आहे. सन १९५१ च्या इंडस्ट्रीज (डेव्हलपमेन्ट अॅन्ड रेग्युलेशन) अॅक्टखालीं आवश्यक असलेलें भारत सरकारचें लायसेन्स हा साखर कारखाना काढण्यासाठी मिळालें आहे. सन १९५३-५४ चें भारतांतील साखरेचें एकूण उत्पादन अंदाजें १० ते ११ लाख टनांपर्यंत होईल. पण हल्लींचा साखरेचा वार्षिक खप मात्र अंदाजें १६ लक्ष टनांचा आहे. त्यामुळें ही सुमारें ५ लक्ष टनांची तूट भरून काढण्यासाठी भारतांत अधिक साखर उत्पादन करण्यास वाव आहे. चितळे अॅग्रिकल्चरल् प्रॉडक्टस् लिमिटेड या कंपनीचे मॅ. एजंट श्री. श्री. द. चितळे व श्री. वा. द. चितळे या बंधुद्वयांनीं या साखरकारखान्याची मुहूर्तमेढ रोवली आहे. हे दोघेही चितळे अॅण्ड कंपनी लिमिटेड या कंपनीचे डायरेक्टर्स असून सदर कंपनी या साखर कंपनीची मॅनेजिंग एजन्टस् आहे.

चितळे अॅग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लिमिटेड ही कंपनी आतां आपल्या १४ व्या वर्षांत पदार्पण करीत असून त्या कंपनीची वार्षिक उलाढाल रु. २० लक्षांहून अधिक आहे. ही कंपनी आपल्या मालमत्तेतील बरीचशी मौल्यवान मालमत्ता या साखर कंपनीस विकत देणार असून, त्याच्या मोबदल्यांत या साखर कंपनीनें त्यांना समान किंमतीचे पूर्ण भरपाई झालेले ऑर्डिनरी शेअर्स द्यावयाचे आहेत. या मालमत्तेंत पक्क्या इमारती, गोडाउन्स, मोटरकार्स, लॉऱ्या, तेल सांठवणींच्या मोठाल्या टाक्या, पिठाच्या चक्क्या, वर्कशॉपची यंत्रसामुग्री, पॉवर हाऊस, शेतीचीं यंत्रें व अवजारें वगैरे व इतर मालमत्ता असून तिची तज्ज्ञानें केलेली किंमत रु. १४,९९,९०० आहे. अशाप्रकारें जागचेजागीं तयार मालमत्ता उपलब्ध असल्यामुळें या साखर कंपनीच्या कार्यास नेहमींच्या मानानें फारच लवकर सुरुवात होऊं शकेल, हा एक फार मोठा फायदा या साखर कंपनीस आहे.

या साखर कारखान्यास दररोज जवळजवळ ६०० टन ऊंस गाळतां येईल, व सर्वसाधारणपणें १३० दिवसांच्या गळिताच्या हंगामांत सुमारें ७० हजार ते ८० हजार टन ऊंस गाळतां येईल. सदर उंसाचा पुरवठा मेसर्स चितळे अॅग्रिकल्चरल प्रॉडक्टस् लिमिटेड व आसपासचे उसाचे बागाईतदार यांचेकडून होऊन त्याची सुमारें ८० हजार पोतीं साखर दर हंगामांत तयार होऊं शकेल व सध्यांच्या बाजारभावाप्रमाणें त्या साखरेची किंमत सुमारें रु. ६० लक्ष होईल. या कार्यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री खरेदी करण्याची व्यवस्था चालू आहे. हा साखर कारखाना सन १९५५ च्या ऑक्टोबरपर्यंत चालू होऊं शकेल अशी अपेक्षा आहे.

ज्या किमान वर्गणीवर डायरेक्टर्स शेअर मंजुरीस सुरुवात करतील ती वर्गणी ५०,००० रुपयांच्या दर्शनी किंमतीच्या (ऑर्डिनरी आणि अथवा प्रेफरन्स) शेअर्सइतकी ठरविली आहे. कारण कंपनीला उंसाच्या लागवडीसाठीं आपल्या अंगावर कांहींही खर्च करावयाचा नसून शिवाय रु. १४,९९,९००/- किंमतीची मालमत्ता उपयोगासाठीं ताबडतोब सिद्ध स्थितींतच कंपनीला जागेवर मिळत आहे.

कंपनीचें बोर्ड ऑफ डायरेक्टर्स खालीलप्रमाणें आहे:—

१ श्री. द. रा. नाईक, जे. पी., जमीनदार व व्यापारी, सिताराम बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई नं. १.

२ श्री. च. वि. जसाणी, भागीदार, मे. मूळजी सिक्का आणि कं., बँकर्स (सावकार), व्यापारी व जमीनदार, गोन्दिया (मध्य प्रदेश)

३ श्री. श्री. द. चितळे, व्यापारी, ११, वेस्टर्न इंडिया हाऊस, फिरोझशहा मेहता रोड, फोर्ट, मुंबई नं. १.

४ श्री. वा. द. चितळे, ऊंसतज्ज्ञ व व्यापारी, चितळेनगर, (जिल्हा : सोलापूर.)

कंपनीचें अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रुपये ३५,००,००० (रुपये पस्तीस लाख) खालीलप्रमाणें विभागलें आहे:—

२,५०,००० ऑर्डिनरी शेअर्स, प्रत्येकीं रु. १० चा व १०,००० सहा टक्के क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स, प्रत्येकीं रु. १०० चा.

---

### फक्त गरीब शेतकऱ्यांना तगाई कर्जें मिळणार

मुंबई सरकारनें सुखवस्तु लोकांना तगाई न देण्याचें आपलें धोरण १९५४-५५ सालांतहि चालू ठेवण्याचें ठरविलें आहे. यापुढेंहि तगाई कर्जें फक्त गरीब शेतकऱ्यांनाच देण्यांत येतील.

अॅग्रिकल्चरल लोन्स अॅक्टाखाली २,००० रुपयांपेक्षा अधिक रकमेची किंवा लॅण्ड इम्प्रूव्हमेंट लोन्स अॅक्टाखाली ५,००० रुपयांपेक्षा अधिक रकमेची तगाई कर्जें जिल्ह्याच्या कलेक्टरांकडून दिलीं जाणार नाहींत. अर्थात् ट्रॅक्टर किंवा विशिष्ट कंपनीचीं देशी ऑइल इंजिनें खरेदी करण्यासाठी तगाई द्यावयाची असेल तर गोष्ट वेगळी. ट्रॅक्टर खरेदी करण्यासाठी एकाद्या व्यक्तीस ५,००० रुपयांपेक्षा अधिक रकमेचें कर्ज मंजूर केलें जाईल. मात्र सदरहू इसमास दुसऱ्या मार्गानें वाजवी व्याजानें कर्ज मिळण्याची सोय नाहीं याची खात्री पटली पाहिजे आणि जिल्हा विकासमंडळानें अशा इसमास तगाई देण्याची शिफारस केली पाहिजे. तसेंच त्याच्या प्रकरणाचा गुणपरत्वें विचार करून त्याला कर्ज मंजूर करण्यांत येईल. तसेंच सरकारनें ठरवून दिलेल्या कंपन्यांची देशी ऑईल इंजिनें खरेदी करण्यासाठींहि ५,००० रुपयांपेक्षां अधिक रकमेचें कर्ज मिळूं शकेल. कांहीं विशिष्ट कंपन्यांनीं शेतकऱ्यांना तगाईवर सवलतीच्या किंमतीनें ऑइल इंजिनें देण्याचें कबूल केलें आहे आणि विशिष्ट मुदतीपर्यंत मोफत सर्व्हिस व सुटे भाग पुरविण्याचें मान्य केलें आहे.

---

### सावकारांच्या लायसेन्सांचें नूतनीकरण

मुंबई राज्यांतील ज्या लायसेन्सदार सावकारांना १९५४-५५ सालासाठी लायसेन्सांचें नूतनीकरण करून घ्यावयाचें असेल त्यांनीं आपले अर्ज १९४७ च्या मुंबई मनिलेंडर्स रूल्समधील ४ (१) नियमान्वयें ठरवून दिलेल्या फॉर्मवर व त्या पद्धतीनें आपापल्या विभागाच्या असिस्टंट रजिस्ट्रार ऑफ मनिलेंडर्स यांच्याकडे ३१ जुलैपर्यंत पोहोंचतील अशा बेतानें पाठवावे, असा त्यांस सल्ला देण्यांत येत आहे. या तारखेनंतर येणाऱ्या अर्जांच्या बाबतींत अर्जदारांना सदरहू कायद्याच्या कलम ६ (४) अन्वयें दुप्पट फी द्यावी लागेल.

१९५३-५४ सालाकरितां सावकारांना दिलेल्या लायसेन्सांची मुदत ३१ जुलै रोजीं संपते.

## शेतीचें व औद्योगिक उत्पादन

### (रिझर्व्ह बँकेचा करन्सी–फायनॅन्सवरील अहवाल)

पंचवार्षिक योजनेच्या दुसऱ्या वर्षात, म्हणजे १९५२–५३ मध्यें भारतांतील शेतीच्या उत्पादनांत बरीच प्रगति झाली. धान्याचें उत्पादन पंचवार्षिक योजनेच्या मूळ वर्षापेक्षा (१९४९–५०) २१ लक्ष टन ज्यास्त झालें; म्हणजे तें ४% वाढलें. कपास आणि ताग ह्यांचे बाबतींत उत्पादनवाढ अनुक्रमें ५% व ४०% अनुभवास आली. उसाच्या निर्मितींत मात्र वाढ झाली नाहीं आणि गळिताच्या धान्यांची लागवड ज्यास्त होऊनहि प्रत्यक्ष उत्पादन, प्रतिकूल हवामानामुळें, कमीच झालें.

**१९५१–५३ मधील शेतीचें उत्पादन**

| | पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें | | १९५२–५३ | |
|---|---|---|---|---|
| | १९५५-५६ चें उद्दिष्ट | १९५०-५१ चे मानानें वाढ % | उत्पादन | १९५०-५१ चे मानानें वाढ-घट % |
| अन्नधान्यें (लक्ष टन) | ६१६ | १४ | ५६१ | + ४ |
| ऊस ( ,, ) | ६३ | १२ | ५३ | – ६ |
| गळिताची धान्यें ( ,, ) | ५६ | ८ | ४६ | – १० |
| कपास (लक्ष गांठी) | ४२·२ | ४२ | ३१·३१ | + ५ |
| ताग (लक्ष गांठी) | ५३·९ | ६३ | ४६·०५ | + ४० |

टीपः–अन्नधान्याचे बाबतींतील आकडे १९५०–५१ ऐवजीं १९४९–५० चे आहेत.

अन्नधान्यापैकीं द्विदल धान्यांचें उत्पादन ४७६ लक्ष टन झालें; १९५१–५२ मध्यें तें ४२४· लक्ष टन होतें. स्वातंत्र्योत्तराच्या काळांतील उत्पादनाचा हा उच्चांक आहे. लागवडीचें क्षेत्र फक्त ३·९% नें वाढूनहि एकाच वर्षांत उत्पादन मात्र १२·१% वाढलें. तांदूळ, गहूं आणि बाजरी ह्यांच्या उत्पादनांत वाढ झाली. १९५२–५३ चे मानानेंहि १९५३–५४ मधील उत्पादन ज्यास्त भरेल, असा अंदाज आहे; कारण ह्या काळांतील हवापाणी खरीप आणि रब्बी अशा दोन्हीं मोसमांना अनुकूल होतें. एकट्या तांदुळापुरतेंच पाहिलें, तर पूर्वीच्या वर्षीच्या मानानें १९५३–५४ मधील उत्पादन २०% ज्यास्त भरण्याचा अंदाज आहे. लागवडीच्या क्षेत्रांतील वाढ फक्त ३% च असतांना ही उत्पादनवाढ शक्य होण्याचें कारण, अनुकूल पाऊसपाणी व जपानी पद्धतीच्या भातशेतीचा प्रसार हें होय.

भारत सरकारनें राज्य सरकारांना १९५३–५४ मध्यें धान्याच्या निर्मितींत वाढ घडवून आणण्यासाठीं २९ कोटी रु. कर्जाऊ व ५ कोटी रु. ग्रँटच्या स्वरूपांत दिले. अमोनिअम सल्फेट आणि सुधारलेल्या जातींचें बी ह्यांचा प्रसार व पाणीपुरवठ्याच्या लहान योजना, ह्यांवर हे पैसे खर्च करण्यांत आले. १९५३–५४ मधील अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेमुळें देशांतील त्यांचें उत्पादन पूर्वीच्या वर्षीच्या मानानें १३·५५ लक्ष टनांनीं वाढेल, अशी अपेक्षा आहे.

कपाशीच्या उत्पादनांत वाढ घडवून आणण्यासाठीं भारत सरकारनें चांगलें बी व खतें ह्यांच्या खरेदीसाठीं राज्य सरकारांना अनुक्रमें ९२ लक्ष रु. व १२ लक्ष रु. बिन्व्याजी कर्जें दिलीं. पण, प्रत्यक्ष उत्पादन प्रतिकूल हवामानामुळें वाढूं शकलें नाहीं. १९५३–५४ मधील उत्पादन मात्र वाढलें असल्याचा अंदाज आहे. तागाचें उत्पादनहि १९५२–५३ च्या मानानें १९५३–५४ मध्यें घटलें आहे. प्रतिकूल हवामान, पेरणीच्या वेळीं उतरलेल्या




किंमती आणि प. बंगाल व उत्तर प्रदेश येथें पुरांमुळें व किडीमुळें झालेलें नुकसान, ह्यांचा तो परिणाम होय.

पांच प्रमुख गळिताच्या धान्यांचें उत्पादन १९५०–५१ मध्यें ४८२ लक्ष टन झालें होतें, तें १९५२–५३ मध्यें ४६·४ लक्ष टनांवर उतरलें. १९५३–५४ मध्यें उत्पादन बरेंच वाढलेलें आढळेल, अशी अपेक्षा आहे. चहाच्या धंद्यास गेलें वर्ष उत्तमच गेलें व चहाची निर्गत बरीच वाढली.

औद्योगिक उत्पादनांत १९५० पासून एकसारखी वाढ होत गेली आहे. १९४६=१०० ह्या इंडेक्स नंबरप्रमाणें, तें उत्पादन १९५० मध्यें १०५·१, १९५१मध्यें ११७·२, १९५२मध्यें १२८·९ व १९५३ मध्यें १३५·२ असें सुधारत गेलें. १९५२ चे मानानें १९५३ मध्यें उत्पादनवाढीची गति थोडी कमी राहिली, पण कापड व मीठ ह्यांचे बाबतींत उत्पादनानें नवे उच्चांक गाठले व दोघांनींहि पंचवार्षिक योजनेचीं लक्ष्यें ओलांडलीं. इंजिनिअरिंग व रासायनिक धंदेहि सुधारले. परंतु, साखर, ताग, कोळसा व पोलाद ह्यांच्या उत्पादनांत घट झाली. औद्योगिक उत्पादनाच्या एकूण सुधारणेस सरकारी उपक्रमांवरील वाढत्या खर्चानें बराच हातभार लावलेला आहे.

### मि. क्लार्क ह्यांची निवृत्ति

दि बँक ऑफ इंडिया लि. चे जनरल मॅनेजर, मि. ए. सी. क्लार्क, हे सेवानिवृत्त होऊन नुकतेच इंग्लंडला रवाना झाले. हिंदी जॉइंट स्टॉक बँकिंगशीं त्यांचा सुमारें ४० वर्षें निकटचा संबंध होता. बॉर्कलेज बँकेंत त्यांनीं प्रथम प्रारंभ केला आणि पहिल्या महायुद्धानंतर ते बँक ऑफ इंडियांत कनिष्ठ अधिकारी म्हणून दाखल झाले व १९४३ मध्यें, सर अलेक्झँडर ग्रे ह्यांच्यानंतर, बँकेचे जनरल मॅनेजर झाले. मि. डी. आर. थॉम हे नवे जनरल मॅनेजर झाले आहेत.

### दि इन्स्टिट्यूट ऑफ सेक्रेटरीज, मुंबई

सेक्रेटरीच्या व्यवसायांतील लोकांची ही संस्था मुंबई येथें स्थापन झाली आहे. चार्टर्ड अकौंटंट्स व कंपन्यांचे सेक्रेटरी ह्यांना तिचे सभासद होतां येईल. ७० सभासदांची नोंद आतां-पर्यंत झाली आहे. प्रवेश फी ५ रु. असून वार्षिक वर्गणी १५ रु. आहे. इन्स्टिट्यूटची कचेरी दलाल स्ट्रीटवरील लॅटिन चेंबर्समधील ४ थ्या मजल्यावर आहे.

चेकवरची मुलखावेगळी सही—फर्स्ट नॅशनल बँक, मॅन्स-फील्ड ह्या बँकेवर ७ आठवडे वयाच्या मुलाच्या नांवानें चेक काढण्यांत आला होता. ह्या मुलानें चेकवर सही कशी करावी असा प्रश्न पडला असतां बँकेनें त्याच्या पावलाचा ठसा सहीबद्दल योग्य मानून चेकची रक्कम दिली, असें समजतें.

**आसामचा औद्योगिक विकास**—आसाम राज्यांतील प्रमुख व मध्यम प्रतीच्या उद्योगधंद्यांना आर्थिक मदत देण्यासाठी राज्य-सरकारनें ५ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. ज्या खाजगी भांडवलदारांना मध्यम प्रतीचे नवीन धंदे काढावयाचे असतील त्यांनीं जुलै २५ पूर्वी अर्ज करावयाचे आहेत.

---

श्री

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड,**
**९८० सदाशिव पेठ, पुणें २.**

## नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं, दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. च्या भागीदारांची एकोणिसावी वार्षिक सर्वसाधारण सभा, गोखले हॉल, लक्ष्मी रोड, पुणें २, येथें शनिवार दि. ३१ जुलै १९५४ रोजीं दुपारीं ३ वाजतां भरविण्यांत येणार असून त्या वेळीं खालील कामांचा विचार होईल.

१. दि. ३० सप्टेंबर १९५३ अखेर संपलेल्या वर्षाबद्दलचा डायरेक्टर्स यांचा अहवाल व ऑडिटर्स यांनीं तपासून बरोबर, असा शेरा मारलेला ताळेबंद व नफातोटा-पत्रक स्वीकारणें.

२. अहवालांत नमूद केलेलें डिव्हिडंड देण्यास मंजुरी देणें.

३. निवृत्त होणाऱ्या डायरेक्टरांच्या जागीं डायरेक्टर्स निवडणें. (निवृत्त होणारे डायरेक्टर्स फेरनिवडणुकीस पात्र आहेत.)

४. चालू सालीं कोऑप्ट केलेले चार डायरेक्टर्स कंपनीच्या आर्टिकल नं. ९५ प्रमाणें निवृत्त होत आहेत व ते फेर-निवडणुकीस पात्र आहेत.

५. चालू वर्षाकरितां ऑडिटर्स नेमणें व त्यांचा मेहनताना निश्चित करणें.

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांच्या हुकुमावरून

पुणें २.
१० जुलै १९५४.
सी. जी. आगाशे अॅण्ड को.
मॅनेजिंग एजण्टस्.

**सूचना**—कंपनीचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें दि. १७ जुलै १९५४ ते दि. ६ ऑगस्ट १९५४ अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

---

**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर**

## नोटीस

या बँकेच्या सन १९५४-५५ च्या बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची निवडणूक व्हावयाची आहे. त्यासाठी वैयक्तिक मतदारांची यादी तयार झाली असून ती बँकेच्या मुख्य कचेरींत व शाखा कचेऱ्यांत नोटीसबोर्डावर निवडणुकीचे नियम नं. ३ प्रमाणें लावण्यांत आली आहे.

तरी निवडणुकीसाठी लायक उमेदवारांचीं नांवें सूचक व अनुमोदक यांच्या सहीसह व उमेदवारांचे लेखी संमतीनें दिनांक ९-८-१९५४ रोजीं दुपारीं चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी बँकेच्या मुख्य कचेरींत दाखल होतील अशा बेतानें पाठवून द्यावींत.

सदर बाबत जास्त माहिती पाहिजे असल्यास ती बँकेच्या मुख्य कचेरींत कामाचे वेळांत मिळूं शकेल.

पुणें शहर,
दिनांक १०-७-५४
मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

**इंदूरजवळ कांचेची वाळू**—इंदूर जवळ बामोर ह्या ठिकाणीं कांच करण्याची वाळू मोठ्या प्रमाणावर सांपडल्याचें वृत्त आहे. पांढऱ्या रंगाच्या ह्या वाळूचा उपयोग करून कांचेचा एक कारखाना काढण्याचेंहि घाटत आहे. कांचेचा कारखाना काढण्यासाठी खाजगी कारखानदारांना आवाहन करण्यांत आलें आहे.

**आगगाडीचे डबे बांधण्याचा कारखाना**—पेरांबूर येथील रेल्वेचे डबे बांधण्याचा कारखाना १९५५ च्या जुलै महिनाअखेर पूर्ण होईल असें समजतें. कारखाना उभारण्यास मदत करण्यासाठी स्विस एंजिनिअर्सची एक तुकडी लवकरच भारतांत येणार आहे असें समजतें. कारखान्याचा मुख्य एंजिनिअर स्विस राहील. पण त्याचा दुय्यम मात्र भारतीयच राहील.

---

**पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., पुणें शहर**

## नोटीस

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सन १९५४-५५ च्या हिशेबांची तपासणी करण्याकरितां येत्या वार्षिक साधारण सभेंत दोन हिशेब तपासनिसांची नेमणूक करावयाची आहे.

सदर जागांसाठी ज्यास उमेदवार म्हणून उभे रहावयाचे असेल त्यांनीं आपले अर्ज बँकेच्या पुणें कचेरींत दिनांक ३१-७-५४ रोजीं दुपारीं चार वाजेपर्यंत अगर त्यापूर्वी पोंचतील अशा बेतानें पाठवून द्यावेत.

उमेदवारानें सदर अर्जांत आपलें संपूर्ण नांव, पत्ता व शैक्षणिक लायकी नमूद केली पाहिजेत.

हिशेबतपासनिसांच्या नेमणुकीबाबतचे बँकेनें केलेले नियम बँकेच्या मुख्य कचेरींत कामाचे वेळांत पहावयास मिळतील.

पुणें शहर,
दि. १०-७-५४
मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

---


# कण आणि क्षण

## (सुखी जीवनाच्या पाऊलवाटा)

पृष्ठसंख्या १६८ } **दुसरी आवृत्ति** { किं. २॥ रु. ट. ख. ४ आ.

लेखक : श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

★

"या पुस्तकाचें वाचन करून त्यांत चित्ताकर्षक पद्धतीनें दिलेल्या सूचनांचें अनुकरण करणारें माणूस खरोखर व्यवहारचतुर, लोकप्रिय आणि सुखी झाल्याशिवाय राहणार नाहीं."

—चिंतामण विनायक जोशी

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा :—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर ( बेलापूर रोड ), ओझर ( जि. नाशिक ) खोपोली ( जि. कुलाबा )

| | |
|---|---|
| श्री. कं. पां. जोशी ( अध्यक्ष ) | श्री. ह. ब. गिरमे ( उपाध्यक्ष ) |

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर } मॅनेजिंग डायरेक्टर.

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

| | |
|---|---|
| श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन | श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन |

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

### बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

| | |
|---|---|
| श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. | न. भू. बा. पां. थोपटे, उपाध्यक्ष. |
| रावसाहेब व. द. खोले. | श्री. चं. रा. राठी. |
| श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. | श्री. बा. ग. धंदुके. |

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७३.

अधिक माहितीसाठी लिहा.

| | |
|---|---|
| वाय. एस. जोशी अ. मॅनेजर. | एन. व्ही. पांडव मॅनेजर |

## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| टेलिफोन नं. ३८,३८१ ३८,३८२ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ तारेचा पत्ता : फार्मरबँक |

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३४,०६,७५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ६०,०६,७५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५७,५४,८०० |
| ठेवी | रु. ७,९०,२५,३०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,७०,२७,००० |

**१६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.